Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## काँग्रेस-राजदने माझ्या आईला शिवीगाळ केली हा देशातील प्रत्येक आईचा अपमान - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२पटना**

२७ ऑगस्ट रोजी बिहारमधील दरभंगा येथे राहुल गांधी यांच्या मतदार हक्क यात्रेदरम्यान पंतप्रधान मोदींच्या आईवर अत्याचार करण्यात आला. सातव्या दिवशी, पंतप्रधान मोदींनी समोर येऊन या गैरवर्तनाचे उत्तर दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी म्हणाले, 'काही दिवसांपूर्वी बिहारमध्ये जे घडले त्याची मी कल्पनाही केली नव्हती. बिहारमध्ये काँग्रेसच्या व्यासपीठावरून माझ्या आईला शिवीगाळ करण्यात आली. हे शिवीगाळ केवळ माझ्या आईचा अपमान नाही तर देशातील माता, बहिणी आणि मुलींचा अपमान आहे.'



पंतप्रधान म्हणाले, 'या घटनेचे दुःख माझ्या हृदयात तितकेच आहे जितके बिहारच्या लोकांच्या दुःखात आहे. मी माझे दुःख तुमच्यासोबत शेअर करत आहे, जेणेकरून मी हे दुःख सहन करू शकेन.' पंतप्रधानांनी दिल्लीहून बिहारच्या लोकांना व्हर्च्युअल पद्धतीने संबोधित करताना हे सांगितले. ते बिहार राज्य जीविका निधी शाखा सहकारी संघ लिमिटेडच्या शुभारंभ कार्यक्रमाशी जोडले गेले होते.पंतप्रधान म्हणाले, 'मी एका गरीब कुटुंबातील आहे. मी समाज आणि देशाची सेवा करण्यात गुंतलो आहे. मी माझ्या देशासाठी आणि माझ्या देशवासियांसाठी दररोज आणि प्रत्येक क्षणी कठोर परिश्रम केले. माझ्या आईच्या आशीर्वादाने यात खूप मोठी भूमिका बजावली. ज्या आईने मला जन्म दिला त्या आईने मला माझ्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त केले.'

आजपासून २० दिवसांनी नवरात्र सुरू होईल, त्यानंतर छठमैयाची पूजा केली जाईल. छठ सण साजरा केला जाईल. भारताच्या भूमीने कधीही आईचा अपमान सहन केलेला नाही. मी बिहारच्या लोकांना हे देखील सांगेन की, या अपमानाची भरपाई करणे ही बिहारच्या प्रत्येक सुपुत्राची जबाबदारी आहे. राजद आणि काँग्रेसचे नेते कुठेही जातील, ते कोणत्याही रस्त्यावर जातील, त्यांचे सर्व बाजूंनी ऐकले पाहिजे. त्यांना जाब विचारला पाहिजे. प्रत्येक रस्त्यावरून आवाज आला पाहिजे, आम्ही आईचा अपमान सहन करणार नसल्याचं मोदी म्हणालेत.

## मनोज जरांगेंच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य

### आपला विजय झाला जरांगेची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

जिंकलो..... राजेहो तुमच्या ताकदीवर आपण जिंकलो, सरकारने आपल्या मान्य केल्याचं सांगत आझाद मैदानावर एक मराठा, लाख मराठा, छत्रपती शिवाजी महाराज की जय... गणपती बाप्पा मोरया.. अशी घोषणाबाजी करण्यात आली. मुंबईतील आझाद मैदान परिसरात पाटील पाटील.. घोषणांनी दुमदुमला होता. जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील मागण्या राज्य सरकारच्यावतीने मान्य करण्यात आल्या असून मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अनेक नेते व्यासपीठावर होते. यावेळी, कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या याची माहितीही जरांगे पाटील यांनी दिली. तसेच, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय काढण्यासाठी २ महिन्यांचा अवधीही राज्य सरकारला देण्यात आला आहे.




मी मराठा आरक्षण समितीचा स्वागत करतो, सचिव सुद्धा आज हजर आहेत, त्यांचे आभार. विषय शांततेत समजून घेण्याची गरज आहे. आपलं म्हणणं होत ते निवेदन आपण सादर केलं होत. त्यानुसार, सरकारने आपल्या मागण्या मान्य केल्या आहेत. आपली पहिली मागणी होती, हैद्राबाद गॅजेटची तात्काळ अंमलबजावणी करावी. आता ते म्हणाले आपल्याला मान्य झालं की जीआर काढणार, यांच्याशी चर्चा केल्यानंतर आपण अभ्यासकांसोबत सुद्धा चर्चा करणार आहोत नाहीतर वाशी सारखा व्हायचं, असे म्हणत वाशीमध्ये आपली फसवणूक झाल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

हैद्राबाद गॅजेट लागू करण्याच्या मागणीस उपसमितीने मान्यता दिली आहे, याचा अर्थ हैद्राबाद गॅजेटची अंमलबजावणी करण्याची सूचना उपसमितीकडून देण्यात येईल. सातारा गॅजेटबद्दल आपण मागणी केली होती, म्हणजे पश्चिम महाराष्ट्र मराठा यामध्ये येतो. औंध आणि सातारा मध्ये काही त्रुटी आहेत. पुढील १५ दिवसात कायदेशीर त्रुटीचा अभ्यास करून अंमलबजावणी केली जाईल, असे शासनाने म्हटले आहे. मी एक महिना देतो, राजे सांगा अंमलबजावणी करणार का?

हो म्हणा, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शिवेंद्रराजे यांच्याकडूनच याची हमी घेतली आहे. त्यामुळे, आता दोन मागण्यांची अंमलबाजवणी झाल्याचं म्हटलं.

**५ मागण्यांचे आजच शासन निर्णय होणार**

हैदराबादच्या गॅजेटला अंमलबाजावणीला दिली आहे, पुढील काही तासांत याचा शासन आदेश निघेल.

सातारा संस्थानच्या गॅजेट्यर तपासून कायदेशीर पद्धतीने जलदगतीने म्हणजेच १५ दिवसांत अंमलबजावणी करु

सातारा गॅजेटेअर लागू करण्यासाठी मी एक महिना दिला आहे, त्याचाही शासन आदेश निघणार आहे.

सप्टेंबरअखेरपर्यंत सर्व मराठा आंदोलकांविरोधातले गुन्हे मागे घेणार, त्याचाही शासन आदेश लवकरच निघणार आहे.

आर्थिक मदत आणि शैक्षणिक पात्रतेनूसार शासकिय नोकरी देणार

## आझाद मैदान रिकामे करा; मुंबई पोलिसांची मनोज जरांगेंना नोटीस

### मराठा आंदोलकांवर नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर मराठा कोअर कमिटीला मुंबई पोलिसांनी नोटीस बजावली आहे. पोलिसांनी १ सप्टेंबर रोजी आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी नाकारली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशांचे आणि आंदोलनासाठी घालून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. आंदोलकांनी आझाद मैदान रिकामे करावे, असेही या नोटिशीत म्हटले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी झालेल्या सुनावणीत मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन करणारे मनोज जरांगे यांच्यासह शहरभर विशेषतः दक्षिण मुंबईत भटकंती करणाऱ्या मराठा आंदोलकांना मुंबई ठप्प तसेच मुंबईकरांची गैरसोय करण्याचा अधिकार नाही, अशा शब्दात सुनावले आहे. तसेच परवानगीशिवाय गेल्या तीन दिवसांपासून



आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांवर कारवाई करण्याचे देखील न्यायालयाने आदेश दिले आहेत. रस्ते, पदपाथ तसेच रेल्वे स्थानक मोकळे व स्वच्छ करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

मुंबई पोलिसांनी मराठा आरक्षण कोअर कमिटीला नोटीस बजावल्यानंतर, त्याच वेळी न्यायालयाने राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या आंदोलनाला खारघरमध्ये परवानगी देण्याची स्पष्ट सूचना न्यायालयाने दिली असतानाही, सरकारने त्याची अंमलबजावणी का केली नाही, अशी विचारणा न्यायालयाने केली होती.

आंदोलन करण्यासाठी पोलिस आणि न्यायालयाने दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांनी मागितलेल्या आंदोलनाच्या पुढील परवानग्या नाकारण्यात आल्या आहेत. आझाद मैदान पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या कोअर कमिटीला पाठवलेल्या नोटिशीत, नियमांचे उल्लंघन झाल्याचा उल्लेख करत मैदान तात्काळ खाली करण्याचे म्हटले आहे. त्यामुळे जरांगे पाटील आता कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता

### मराठवाड्यासह विदर्भ व कोकणाला अलर्ट जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

आजपासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीसाठी जोरदार पावसाचा 'अलर्ट' जारी केला आहे. याशिवाय, पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर पावसाचा 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे.



भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात सध्या चक्रवाताची स्थिती सक्रिय आहे. पुढील २४ तासांत हे वारे वायव्य दिशेला सरकून, वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, मध्य महाराष्ट्र, कोकण, गोवा किनारपट्टीसह मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्यापासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढलेला असून, सप्टेंबरच्या सुरुवातीलाही तो कायम राहणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, समुद्राच्या तळाशी मान्सूनच्या द्रोणीय परिस्थितीमुळे कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे, तर राजस्थानच्या मध्य भागात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. यामुळे, २ सप्टेंबरपासून बंगालच्या खाडीवरही एक नवीन कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता असून, याचा परिणाम म्हणून देशाच्या विविध भागांत जोरदार पाऊस पडेल.

येत्या सात दिवसांत गुजरातसह महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. २ आणि २ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. तर ३, ४ आणि ५ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड तसेच पुणे सातारा कोल्हापूर घाटमाथ्यावर हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भातील चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यालाही ऑरेंज अलर्ट आहे .मुंबई, ठाणे, पालघर ,नाशिक ,नगर ,पुणे, बीड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय .उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातही तुफान पावसाची शक्यता आहे.

## हायकोर्टाच्या आदेशानंतर मराठा आंदोलकांच्या पार्किंगमधील गाड्या हटवल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर गेल्या पाच दिवसांपासून आमरण उपोषण सुरू आहे. त्यामुळे दक्षिण मुंबईत मोठ्या संख्येने मराठा आंदोलक एकत्र आले आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबई उच्च न्यायालयाने आज दुपारी मुंबई रिकामी करण्याचे महत्त्वपूर्ण आदेश राज्य सरकारला दिले आहेत.



या आदेशानुसार, गणेशोत्सवादरम्यान मुंबईला छावणीचे स्वरूप येऊ नये यासाठी आंदोलकांना दक्षिण मुंबईत सोडू नये, असे कोर्टाने म्हटले आहे. तसेच आझाद मैदान, सीएसएमटी, मरीन ड्राईव्ह, हुतात्मा चौक आणि दक्षिण मुंबईतील इतर भागांतून आंदोलकांना बाहेर काढण्याचे निर्देश दिले आहेत. यानंतर मुंबई पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली असून, मराठा आंदोलकांच्या पार्किंगमधील गाड्याही हटवल्या आहेत.

मुंबई पोलिसांनी वाडी बंदर परिसरातून मराठा आंदोलकांच्या गाड्या काढायला सुरुवात केली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार, पूर्व मुक्त मार्गाखालील रोडवरून आंदोलकांच्या गाड्या दुसरीकडे पाठवण्यात येत आहेत. पोलिसांच्या विनंतीनंतर ऑरेंज गेट, वाडी बंदर, भाऊचा धक्का, पूर्व मुक्त मार्ग आणि बीपीटी रोड परिसर आता रिकामा होत आहे.

मंत्रालय परिसरातही आता परिस्थिती पुन्हा पूर्वपदावर येत आहे. काल काही मराठा आंदोलकांनी घोषणाबाजी करत मंत्रालयाकडे जाण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त होता, जो आजही कायम आहे. मात्र, वाहतुकीसाठी बंद असलेले काही रस्ते आता पुन्हा सुरू करण्यात आले आहेत.

## मनसेतून बडतर्फ केलेल्या वैभव खेडेकरांच्या पक्ष प्रवेशाचा मुहूर्त ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस आणि कोकण संघटक वैभव खेडेकर यांची पक्ष प्रवेशाबाबत मोठी बातमी समोर आली आहे. पक्षविरोधी कार्य केल्यामुळे काही दिवसांपूर्वी वैभव खेडेकरांची मनसेतून हकालपट्टी करण्यात आली. त्यामुळे खेडेकर आता काय भूमिका घेतात याकडे गेल्या काही दिवसांपासून कोकणाच्या राजकीय वर्तुळाचं लक्ष लागले होते. अशातच ते भाजपमध्ये किंवा शिवसेना शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. या पार्श्वभूमीवर वैभव खेडेकर यांच्या पक्षप्रवेशाचा मुहूर्त आणि पक्ष ठरला आहे. मनसेतून बडतर्फ केलेल्या वैभव खेडेकर हे येत्या ४ सप्टेंबर रोजी भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणार आहे. भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा उपस्थितीत ते मुंबईत भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी दिली आहे. नितेश राणे खेडमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते.

पक्षाला शून्यापासून गावागावात पोहचवण्याचे काम वैभव खेडेकर यांनी केलं आहे. मात्र पक्षाची कारवाई झाल्यावर आमच्यासोबत काम करण्याचा विचार असेल तर सांगा, असे मी वैभव खेडेकर यांना विचारलं. त्यानुसार वैभव खेडेकर यांचा ४ सप्टेंबर रोजी मुंबईत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. अशी माहिती नितेश राणे यांनी दिली आहे.

## पोलीस दलात खळबळ! निलंबित पोलीस निरिक्षकानं आयुष्य संपवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२बीड**

बीडच्या पोलीस दलातून खळबळजनक बातमी समोर येत आहे. निलंबित पोलीस निरिक्षक सुनील नागरगोजे यांनी आत्महत्या केली आहे. अंबाजोगाई शहरातील भाड्याच्या खोलीत त्यांनी आयुष्य संपवलं. सोमवारी रात्री ही घटना उघडकीस आली. त्यांनी आत्महत्या का केली? याचं कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर पोलीस दलासह परिसरात खळबळ उडाली आहे.

सुनील नागरगोजे (वय वर्ष ५७) असे मृत निलंबित पोलीस निरिक्षकाचे नाव आहे. नागरगोजे हे मूळ परळी तालुक्यातील नागदरा येथील रहिवासी होते. अनेक वर्षांच्या सेवेनंतर मागील काही महिन्यांपूर्वी ते नोकरीतून बाहेर पडले होते. नुकतेच त्यांनी अंबाजोगाई येथील घर बांधकामासाठी पडल्याने ते प्रशांत नगर येथे भाड्याने राहत होते.




घटनेच्या दिवशी त्यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी भाड्याच्या घरात कुणीही नसताना सिलिंग फॅनला गळफास लावून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मृतदेह ताब्यात घेत घटनेचा पंचनामा केला.

एअरपोर्टवर २ विमानांची टक्कर, क्षणात आगीचे लोट उठले, ९ जणांचा मृत्यू, तखऊग्ज समोर

त्यानंतर पोलिसांनी शवविच्छेदनासाठी मृतदेह रूग्णालयात पाठवले. दरम्यान, पोलिसांनी घराची तपासणी केली असता, काही सापडले नाही. नागरगोजे यांनी आत्महत्या का केली? याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. अंबाजोगाई पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. निलंबित पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांच्या आत्महत्येने पोलीस दलात मोठी खळबळ निर्माण झाली आहे. त्यांनी आत्महत्या का केली? आत्महत्या करण्यामागचं कारण काय? याचा तपास सुरू आहे.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

## आ. प्रवीण तायडेंनी निधी वळवल्याचा आरोप प्रकरण

# प्रहारच्या चार समर्थकांविरुध्द गुन्हा दाखल

## चांदुर बाजार पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल

### १० कोटीच्या निधीचे प्रकरण तापले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२चा.बाजार-** अचलपूर मतदारसंघातून आ प्रवीण तायडे यांनी १० कोटीचा निधी वळवला, असा खोटा आरोप करुन त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चांदुर बाजार पोलिसांनी प्रहारच्या चार समर्थकांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात श्रमेश सुधाकरराव तायवाडे (४० शिरजगाव बंड) यांनी चांदुर बाजारपोलिसांकडे तक्रार दिली. यानुसार आ प्रवीण तायडे यांच्यावर खोटा आरोप करणारे ऋषीकांत मोहनलाल श्रीवास (४९, चांदुरबाजार), प्रदीव रावसाहेब बंड (५० जसापूर), प्रसन्न दादाराव अढाव (४८, चांदुरबाजार),सुरेश शंकरराव गणेशकर (५०यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांनी आ प्रवीण तायडे यांची बदनामी करण्याच्या उद्देशाने प्रसिध्दीमाध्यमामध्ये निधी वळवल्याच्या दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारीत केल्या. आ बच्चू कडू पराभूत झाल्यानंतर निधी वळवल्याचा आरोप करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. चांदुर बाजार पोलिसांनी याप्रकरणी प्रहारचे चारही समर्थकांविरुध्द कलम ४१५-४२०-४,६८-४६९ ४७१-३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.



#### आरोप-प्रत्यारोपाने राजकीय वादंग

सरकार तुमचे आहे, सत्ता तुमची आहे, मंत्री तुमचे मुख्यमंत्री तुमचे आहेत, मग निधी इतरत्र पळतो कसा? जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि स्वतःचे काळे कारनामे लपविण्यासाठी आ. प्रवीण तायडे बच्चू कडू यांच्यावर खोटे आरोप करत असल्याचे प्रहार पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. बच्चू कडू यांच्या नावाने बनावट पत्र तयार करून, मंत्रीस्तरावरून निधी वळविल्याचा आरोप करणे ही जनतेची दिशाभूल आहे. बच्चू कडू यांच्या पत्रावरून निधी निधी वळविला गेला असे सांगून बच्चू कडू यांना बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. पण खरी सत्ता सत्ताधाऱ्यांच्या हातात आहे. मग माझ्या नावाने पत्र तयार कसे होते ? आणि निधी पळतो कसा? असा सवाल पत्रकार परीषदेत केला होता. त्यानंतर या आरोपांना आ. तायडे यांनी पत्रकार परिषद घेवून उत्तर दिले होते. माजी आमदार बच्चू कडू यांच्या अधिकृत पेजवर त्यांचे चले चपाटे माध्यमातून अफवा पसरवीत आहेत. बच्चू कडू यांचे आंदोलन ब्लॅकमेलिग तर त्यांनी सोफिया मध्ये काय केलं हे सर्वांना माहीत आहेत. मी आमदार झालो म्हणून हे सर्व उघड पडलं. बच्चूकडूयांनी त्यांच्या विरोधकातील लोकांची घरकुलसाठी नाव दिलं नाही तर जवळच्या लोकांना डबल मजली करिता घरकुल बांधून दिली. येणाऱ्या पार्ट टू पत्रकार परिषदेत बच्चू कडू यांची पुराव्या सहित माहिती स्पष्ट करणार, असा इशारा आ. प्रवीण तायडे यांनी दिला होता.

## मोकाट जनावरांचा उपद्रव कायमच!

# राष्ट्रसंत कॉलनी रिंग रोडवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला धोका



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२वरूड-** वरूड नगर परिषदेकडून वारंवार तक्रारी होऊनही मोकाट जनावरांचा बंदोबस्त अद्याप झालेला नाही. सध्या राष्ट्रसंत कॉलनी रिंग रोड परिसरात या जनावरांनी मुक्काम ठोकला असून, या मार्गाने शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे कधीही गंभीर अपघात अथवा अपरिचित घटना घडण्याची भीती नागरिकांत व्यक्त केली जात आहे.रिंग रोडवर गर्दीच्या वेळी गायी-म्हशींचे कळप रस्ता अडवून उभे राहतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतोच, पण दूचाकीस्वार व लहान मुलांना मोठा धोका निर्माण होतो. काही जनावरे आक्रमक होत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाताना भीतीचे वातावरण जाणवते.नगर परिषदेकडून जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी वेळोवेळी केली आहे. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना झालेली नाही. नगरपरिषद झोपेत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच नागरिकांच्या सोयीसाठी मोकाट जनावरे त्वरित हटवून कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे आक्रोश जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशील बेले यांनी म्हटले आहे. अपघात घडल्यावर प्रशासन जबाबदार धरणार कोण, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करून सुरक्षित वातावरण निर्माण करावे असे सामाजिक कार्यकर्ते अश्वपाल वानखडे यांनी म्हटले आहे.

# मोर्शी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचा कारभार रामभरोसे !

## कृषी विभागाने संत्रा उत्पादक शेतकरी सोडला वाऱ्यावर !

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२ मोर्शी** - अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुका संत्रा लागवडीत पुढारलेला आहे. परंतू गेल्या काही वर्षांपासून या भागात सातत्याने निर्माण होणारी दुष्काळी स्थिती, संत्रा पिकावर येणारे कीड-रोग, आंबिया व मृग बहारातील फळांची गळ अशा अनेक समस्यांनी संत्रा उत्पादक हैराण झाले आहेत. राष्ट्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठ तज्ज्ञांकडून व कृषी विभागाकडून या समस्यांच्या निवारणासाठी वेळीच उपाययोजनांची शिफारस केली जात नसल्याचा आरोप राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला असून संत्रा उत्पादक व इतर पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांची भिस्त कृषी विभागावर राहते. परंतु कृषी विभागाच्या उदासीन धोरणामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे.मोर्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या शेतीच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याची तसेच शेतकऱ्यांना ग्रामस्तरावर योजनांची माहिती देणारी यंत्रणा ही तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची आहे. कृषी अधिकारी कार्यालयातूनच अल्पभूधारक शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ दिला जातो. मात्र शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून मोर्शी येथील कृषी अधिकारी कार्यालयाचा कारभार रामभरोसे सुरू आहे. तालुका कृषी अधिकारी यांची वाचक कर्मचाऱ्यांवर नसल्यामुळे तालुका कृषी कार्यालयाचा कारभार ढेपाळला आहे. मोर्शी तालुक्यात ग्रामीण भागात कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यकाची भेट होणे दुर्लभ झालेले आहे. त्यामुळे हे कार्यालय कुचकामी ठरले आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याने कार्यालयाचा कारभार मनमर्जीने सुरू आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयांच्या उदासीन कार्यपद्धतीमुळे शेतकरी मेटाकुटीला आल्याचे दिसून येत आहे. कृषी कार्यालयांतर्गत शेतकऱ्यांच्या लाभाच्या फळबाग, शेततळे, नाला बंदिस्त,




कृषी अवजारे, ठिबक संच व तुषार संच अनुदान योजना राबविण्यात येतात. तसेच एकात्मिक किड नियंत्रण कार्यक्रम यासह अन्य शेतकरी हिताचे कार्यक्रम राबविले जातात. परंतु तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचा कारभार रामभरोसे चालत असल्यामुळे कर्मचारी हेच कार्यालयात मीटिंग, दौरा यासह विविध कारणाने अनुपस्थित राहत असल्याने कुठल्याही कर्मचाऱ्यांवर वचक राहिलेला नाही.परिणामी हम करे सो कायदा याप्रमाणे कर्मचारी वर्ग कार्यालयीन वेळेत कधीही आपल्या कामाच्या ठिकाणी वेळेवर आढळून येत नाही. ग्रामीण भागात शेतकऱ्यांना अत्यंत महत्वाचा असलेला घटक हा कृषी सहाय्यक असतो. परंतु तालुक्यातील काही कृषी सहाय्यक हे गावात जाऊन शेतकऱ्यांना माहिती देताना कधीच दिसून पडत नाही. कृषी विभागाच्या योजना गोरगरीब शेतकऱ्यांना न देता आपल्या मर्जीतील धनदांडग्यांना दिल्या जात असल्याचे निर्दर्शनास येत आहे.

### कृषी विभागाच्या उदासीन धोरणामुळे शेतकरी बेजार !

#### कृषी विभाग, एनआरसीसीसारख्या संस्था म्हणजे पांढरा हत्ती !


विवीध रोगांमुळे संत्रा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने मोर्शी तालुक्यातील शेतकरी पूर्णतः संकटात सापडला आहे तरीसुद्धा कृषी विभागाकडून अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन होतांना दिसत नाही कृषी विद्यापीठ, कृषी विभाग व एनआरसीसी सारख्या वर्षाला कोट्यावधी रुपये खर्च करणाऱ्या संस्था जर शेतकऱ्याच्या कामात येत नसतील तर त्या संस्थांवरील होणारा शासनाचा खर्च व्यर्थ जात आहे. आपल्या शेतातील हिरवीगार झाडे काढून टाकण्याचा निर्णय शेतकऱ्यांना घ्यावा लागणे ही भविष्यातील मोठ्या संकटाची नांदी असून याची शासनाने व राज्य व केंद्रीय कृषी मंत्रालयाने गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.
**-रुपेश वाळके** अध्यक्ष राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस मोर्शी तालुका.

## १०६१ वर्षांची परंपरा असलेला वीरशैव मठाचा गणेशोत्सव

### नेरपिंगळाईच्या मठात नवसाला पावणारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. २ नेरपिंगळाई-** नेर पिंगळाई येथील गुरु गंगाधर स्वामी वीरशैव मठात शके ८८५ (ई.स. ९६३) पासून गणेशोत्सव साजरा केला जातो. मठातील गणपती नवसाला पावणारा असल्याची श्रद्धा पंचक्रोशीत आहे.मठातील गणपतीची मूर्ती वर्षानुवर्षे जतन केलेल्या पवित्र मातीतून साकारली जाते. या मातीवर प्रथम काशीखंड ग्रंथाचे संस्कार केले जातात. अमरावतीच्या मूर्तिकार कलाकारांकडून ही मूर्ती घडवली जाते. पूर्वी सहा ते सात फूट उंचीची मूर्ती असायची. कोविड काळानंतर शासन नियमांनुसार आता चार फूट उंचीची मूर्ती बनवली जाते. दहा दिवस चालणाऱ्या उत्सवात बाहेरगावचे भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. मठाचे सध्याचे अधिपती शिवशंकर शिवाचार्य स्वामी स्वतः भाविकांच्या जेवणाची व्यवस्था पाहतात. गावात पन्नासहून



अधिक सार्वजनिक गणेश मंडळे आहेत. विसर्जन मिरवणुकीत मठाचा गणपती सर्वात पुढे असतो. त्यामागे इतर मंडळे आणि घरगुती गणपतींची मिरवणूक असते. काही भाविक विसर्जन स्थळापासून मठापर्यंत दीड किलोमीटर अंतर दगड-धोंड्यातून लोटांगण घालतात. मिरवणुकीत दिंड्या, ढोल-ताशे, भजनी मंडळे आणि सामाजिक विषयांवरील देखावे सादर केले जातात. मठाच्या गणेशोत्सवाची सुरुवात एका चमत्काराने झाली. १२व्या शतकात येथे राहणाऱ्या शरणाई यांचा मुलगा बालबस्व बेपत्ता झाला होता. श्रीगणेशाची आराधना केल्यानंतर भाद्रपद चतुर्थीच्या दिवशी तो परत आला. तेव्हापासून या मठात गणेशोत्सव साजरा केला जातो.

## अप्पर वर्धा धरणाचे १३ ही दरवाजे उघडले

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती, -** अप्पर वर्धा जलाशयातील पाणीसाठा ९५.७९% इतक्या क्षमतेपर्यंत पोहोचल्याने प्रकल्पातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. आज सकाळी ८:०० वाजता जलाशयाची पातळी ३४२.२५ मीटर इतकी नोंदवण्यात आली असून, यानुसार विसर्गाची मात्रा ५०७.९७ घनमीटर प्रति सेकंद (घमीप्रसे) वरून वाढवून ११५१.५१ घमीप्रसे करण्यात आली आहे. या अनुषंगाने, १३ दरवाजे प्रत्येकी ५५ सेंटीमीटरने उघडण्यात आले असून, वाढीव विसर्ग थेट वर्धा नदी पात्रामध्ये सोडण्यात येत आहे. नागरिकांनी आणि नदीकाठच्या गावांनी दक्ष राहावे, असे आवाहन उर्ध्व वर्धा प्रकल्प पूर नियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे.संबंधित प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि स्थानिक नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.



# छत्री तलाव, प्रथमेश तलावसह विसर्जन स्थळाची पाहणी

## सीपी अरविंद चावरीया यांनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती-** शहरात सार्वजनिक गणेश मंडळाचे विसर्जन ६ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. तसेच ५ सप्टेंबर रोजी ईद ए मिलाद सण सुध्दा साजरा होणार आहे. दरम्यान सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी. याउद्देशाने सोमवार १ सप्टेंबरला सीपी अरविंद चावरिया यांनी राजापेठ, फेजरपुरा, बडनेरा हद्दीतील गणपती विसर्जन मार्ग व स्थळाची पाहणी केली.

त्यावेळी, फर्शी स्टॉप ते छत्री तलाव या मार्गाची पाहणी करुन आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सुचना दिल्या. तसेच, छत्री तलाव, प्रथमेश तलाव व कोंडेश्वर तलाव गणपती विसर्जन ठिकाणी




भेट देवून सुरक्षा प व्यवस्था नियोजनाचे आदेश दिले. छत्री त तलाव, प्रथमेश तलाव व कोंडेश्वर तलाव या ठिकाणी मिरवणूक मार्ग, बॅरीकेटस, पुरेशी प प्रकाश योजना, इर्मजन्सी टॉर्च, सीसीटीव्ही वे कॅमेरे, उंचावरून विसर्जन परीसर पाहणेकरीता मचान तयार करणे, कृत्रिम तलाव तयार करणे, मिरवणुक मार्गावरील झाडांच्या फांद्याची छाटणी करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, स्वीमर्स हजर ठेवणेबाबत महानगरपालीका, विद्युत विभाग व पोलीस अधिकारी यांना सीपी चावरीया यांनीसूचना दिल्यात. त्याच प्रमाणे ५ सप्टेंबरला मुस्लीम धर्मियांच्या वतीने ईद-ए-मिलादुन्नबी सणा निमित्त मिरवणूक काढण्यात येते. या अनुषंगाने पोलीस आयुक्त चावरीया यांनी पोलीस स्टेशन नागपुरी गेट खोलापुरी गेट अतंर्गत मिरवणूक मार्गाची पाहणी केली.त्यानंतर रहदारीचे नियोजन करण्याबाबत सर्व पोलीस अधिकाऱ्यांना सूचना दिल्यात.

### सलोखा राखण्याचे आवाहन

अमरावतीकरांनी यापूर्वी, जातीय सलोखा व सामाजिक एकोपा अबाधित ठेवून शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवणेबाबत पोलिसांना सहकार्य केलेले आहे. त्याअनुषंगाने आगामी धार्मिक सण व उत्सवाचेवेळी सुध्दा अशाच प्रकारे सहकार्य करण्याचे व जातीय सलोखा व एकोपा ठेवण्याबाबत सीपी अरविंद चावरिया यांनी आवाहन करुन सर्व अमरावतीकरांना ईद-ए-मिलाद व इतर धार्मिक सणानिमित्य हार्दीक शुभेच्छा दिल्या आहेत.

### सोशल मिडीयावर राहणार वॉच

सोशल मिडीयावर सायबर पो. ठाणे च्या विशेष पथकाकडून सतत वॉच ठेवण्यात येणार आहे. मिरवणूक मार्ग व वविसर्जन ठिकाणी सीसीटीव्ही, व्हीडीओग्राफर याचे माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. मिरवणूकीमध्ये ज्वलनशिल पदार्थ, शस्त्रे, काठया, आक्षेपार्ह गाणे वाजविणे, आक्षेपार्ह देखावे प्रदर्शित करणे इत्यादी बाबींवर प्रतिबंध घालण्यात आलेले आहे. तसेच, सराईत गुन्हेगार, धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक, जातीय दंगलीतील आरोपींतानाडिटेंड करुन त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना पोलिस आयुक्तांनी दिलेल्या आहेत.

## आज लाडक्या गौराईना निरोपमुहूर्त

# सूर्योदयापासून रात्री ९:५१ पर्यंत गौरी विसर्जन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

सध्या सगळीकडेच लाडक्या बाप्पाचा उत्सव सुरु आहे. घरोघरी गणपती आणि गौरी आवाहन आणि सोमवारला पूजन झाल्यानंतर मंगळवारला २ सप्टेंबर २०२५ रोजी लाडक्या गौराईना निरोप देण्यात येईल. त्यामुळे आपल्या गौराईचं विसर्जन अगदी पारंपरिक पद्धतीने आणि थाटामाटात निर्विघ्नपणे पार पडावं यासाठी प्रत्येकाच्याच घरी लगबग पाहायला मिळतेय. मात्र, गौरी विसर्जनाच्या वेळी काही गोष्टींची काळजी घेणं गरजेचं आहे. काही चुका जर तुम्ही टाळल्या तर नक्कीच गौरी विसर्जन चांगलं पार पडेल.



### ज्येष्ठा गौरी विसर्जनाचा मुहूर्त

गौरी पूजनाच्या तिसऱ्या दिवशी गौराईचं विसर्जन केलं जातं. त्यानुसार, यंदा भाद्रपद शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला २ सप्टेंबर २०२५ रोजी म्हणजेच उद्या गौरीचं विसर्जन करावं. गौरी विसर्जन मूळ नक्षत्रावर सूर्योदयापासून रात्री ९:५१ पर्यंत गौरी विसर्जन करावे. याच दिवशी सात दिवसांच्या बाप्पाचं विसर्जन देखील होणार आहे.–

# जिल्ह्यातील १२ नप, नगर पंचायत प्रारूप प्रभाग रचना५१ आक्षेपांवर आजपासून सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** नगर परिषद ,नगरपंचायतीची प्रारुपप्रभागरचना प्रसिद्धकरण्यात आल्यानंतर धारणी, नांदगाव नगरपंचायतीकरिता २१ तर १० नगरपरिषदांकरिता ३१ ऑगस्टपर्यंत आक्षेपांकरिता मुदत देण्यात होती. या काळात जिल्ह्यातील १२ नगर परिषद, नगर पंचायतीमध्ये एकूण ५१ हरकती व सूचना स्वीकारण्यात आल्या. आता प्रारुप प्रभाग रचनेवरील हरकती वसुचनांवर २ ते ४ सप्टेंबरपर्यंत सुनावणी करण्यात येणार आहे. प्राप्त ५१ आक्षेपांमध्ये सर्वाधिक हरकती आणि सूचना अंजनगाव सुर्जी नगर परिषदेत प्राप्त झाल्या आहेत. तर शेंदुरजना घाट आणि चिखलदरा नगर पंचायतीत शून्य सूचना–हरकती आहेत. त्यामुळे या दोन ठिकाणी सुनावणी होणार नाही. राज्य शासनाने नगरपरिषदांच्या प्रभाग रचने साठीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग रचना प्रक्रिया निश्चित मुदतीत पार पाडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार वेळापत्रका प्रमाणे ११ जूनपासून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली आहे. ३० जुलै दरम्यान अंतर्गत प्रक्रिया आटोपल्यानंतर प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली होती. यामध्येधारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतचीला १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान आक्षेप व हरकती स्वीकारण्यात आल्या. तर १० नगरपरिषदांकरिता ३१ ऑगस्ट पर्यंत हरकती स्वीकारण्यात आल्या. यानुसार वरुड नप. मध्ये–४, मोर्शी नपमध्ये ६, अंजनगाव सुर्जी–१२, अचलपूर–८, चांदुर रेल्वे–३, दर्यापूर–९,धामणगाव –१, चांदुर बाजार –हरकती प्राप्त झाल्यात. तर शेंदुरजना घाट आणि चिखलदरा नपमध्ये एकही १, नांदगाव खंडेश्वर –४ आणि धारणी नगर पंचायतीत ४ आक्षेप आक्षेप व सूचना मिळाली नाहीत्यानंतर आता मंगळवार २ सप्टेंबरला नांदगाव खंडे. नगरपंचायत, धारणी पंचायत, दर्यापूर आणि चांदुर रेल्वेया नगर परिषदेची सुनावणी होणार आहे. तर बुधवार ३ नगर सप्टेंबरला वरुड, अचलपूर, मोर्शी नगर पी होईल. गुरुवार ४ सप्टेंबर रोजी चांदुर बाजार आणि धामणगाव रेल्वे ची नपा ची सुनावणी होईल.



# दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयातील अन्नाचे नमुने पोहचले प्रयोगशाळेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२दर्यापूर**

उपजिल्हा रुग्णालयात दाखल सणांना दिले जाणाऱ्या मोफत जेवणात चक्क अळ्या व सोंडे निघाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यामुळे हे अन्नाचे नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहे.

जेवण हे निकृष्ट दर्जाचे असल्याचा संताप नातेवाईकांनी व्यक्त करीत थेट वैद्यकीय अधीक्षकांच्या दालनात जाऊन डब्यातील अळ्या व सोंडे असलेली भाजी दाखवली होती.



दरम्यान भाजीत अळ्या व सोंडे निघाल्याचे निदर्शनास आल्यामुळे उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गुणवंत जढाळ यांनी पंचनामा करून रविवारी (दि.३१) अन्नाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले आहे. संबंधित ठेकेदारांना नोटीस देण्यात येणार असून पुढील काही दिवसापर्यंत संबंधित ठेकेदारांकडून जेवणसुद्धा बंद करण्यात आले, अशी माहिती डॉ. जठाळ यांनी दिली. तसेच पुढील कारवाईसाठी वरिष्ठांना अहवाल सादर करणार असल्याचे सांगितले.

# मेळघाटासाठी फिरते आरोग्य केंद्र

## पालकमंत्री बावनकुळेयांच्या हस्ते लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताकदि २ तिवसा,**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे भेल चे स्वतंत्र संचालक रमेश मावसकर संकल्पनेतून भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड तर्फे राबविण्यात येणाऱ्या 'स्वस्थ भारत प्रकल्प' अंतर्गत फिरत्या आरोग्य केंद्राचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांचे हस्ते करण्यात आले.

आरोग्य केंद्राच्या माध्यमातून मेळघाट परिसरात ५० मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य शिबिराद्वारे त्यांची तपासणी करून आरोग्य सेवा सुलभ व्हावी, आरोग्य विषयक जनजागृती व्हावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे. लोकार्पण सोहळ्याला खासदार डा. अनिल बोंडे, आप्रताप अडसड, आ राजेश वानखेडे, आ प्रवीण तायडे, आ उमेश यावलकर, दिनेश सूर्यवंशी, प्रभुदास भिलावेकर, रविराज देशमुख, नितीन धांडे आदीउपस्थित होते.


यावेळी रमेश मावसकर, रेखाताई मावसकर, समीर हावरे, मनीष मेन, किशोर हेकडे व डॉ. यशवंत पांडे, विक्की पांडे व अनुराग उके सह डॉ.ची चमू उपस्थित होते

# मनपातर्फे अमरावती फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २ अमरावती**

अमरावती महानगरपालिका व विधिमंत्र संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अमरावती फोटोग्राफी स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत शहरातील तसेच परिसरातील सर्व छायाचित्रकारांना आपला कलागुण सादर करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

या स्पर्धेचा उद्देश अमरावतीचे सांस्कृतिक, नैसर्गिक व शहरी सौंदर्य छायाचित्रणाच्या माध्यमातून प्रदर्शित करणे हा आहे. स्पर्धेसाठी गणेश उत्सवातील अमरावती, अमरावतीचे शहरी व सांस्कृतिक सौंदर्य, अमरावती परिसरातील निसर्ग व वन्यजीव या तीन विषयांवर छायाचित्रे स्वीकारली जाणार आहेत. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे व सन्मानचिन्ह देण्यात येणार येईल. महापालिकेतर्फे निवडक छायाचित्रांचेप्रदर्शन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित केले जाईल.




ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून सहभागासाठी छायाचित्रांची सॉफ्ट कॉपी (पी डी एफ फॉरमॅट) ईमेलवर असून त्यावर २१ सप्टेंबर २०२५ पर्यंत फोटो पाठवणे आवश्यक आहे. amc.pro1959gmail.com या ईमेलवर स्पर्धेनी फोटो पाठवावे.

विधिमंत्र संस्थेचे आयोजक देवव्रत कुळकर्णी म्हणाले, ही स्पर्धा म्हणजे अमरावतीच्या सौंदर्याचा उत्सव आहे. लवकरच शहरातील कलाकारांसाठी एक भव्य मंच उभारण्याचे नियोजनही आहे.

> ही फोटोग्राफी स्पर्धा केवळ कलात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणार नाही, तर अमरावतीचा वारसा, संस्कृती व पर्यावरण देखील छायाचित्रांच्या माध्यमातून उजागर करेल. शहरातील व्यावसायिक छायाचित्रकार, हौशी फोटोग्राफर्स व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.
>
> **सौम्या शर्मा चांडक**,मनपा आयुक्त,



या स्पर्धेसाठी खालील तीन विषयांवर आधारित छायाचित्रे मागविण्यात आली आहेत: गणेश उत्सवातील अमरावती, अमरावतीचे शहरी व सांस्कृतिक सौंदर्य, अमरावती परिसरातील निसर्ग व वन्यजीव.

# गणरायाच्या चरणी वही, पेन दान करुया, चला विद्यार्थी घडवूया !

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती :**

राज्यात सर्वत्र गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. याच उत्सवानिमित्त मिशन सोशल वेलफेअर ग्रुपच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरातील काही सार्वजनिक मंडळांमध्ये एक वही एक पेन दान हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रुपच्या वतीने मंडळांमध्ये एक दानपेटी ठेवण्यात आली आहे. या पेटीमध्ये प्रत्येकाने एक वही एक पेन दान करुन सहकार्य करण्याचे आवाहन मिशन सोशल वेलफेअर ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

आजही समाजात अनेक गरीब विद्यार्थी त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर आहेत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे ही काळाची गरज आहे. गणपत्ती बाप्पाला आपण बुद्धीचा राजा म्हणूनही संबोधित करतो. त्यामुळे या बुद्धीच्या देवता पुढे आपण एक वही एक पेन दान करुन विद्यार्थी घडविण्याच्या या उपक्रमामध्ये सहभागी होऊ शकता. तुम्ही दान केलेले वही,पेन हे मिशन वेलफेअर





ग्रुपच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना या उपक्रमात वही पेन दान करायचे आहे त्यांनी मदतीसाठी ग्रुपचे संस्थापक /अध्यक्ष प्रदीप दांडेकर ८४०८०८२५७९, श्रद्धा खानजोडे ८६६८४८१३३२, सुयश राऊळ ९९२३१९४३५४, प्रतिक्षा मोहोड ८७६७६१२९४३ या क्रमांकावर देखील संपर्क करावा.

## उद्या शेतकरी संघटनेची बैठक

# शरद जोशी यांना वाहणार आदरांजली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२चा.रेल्वे –** शेतकरी नेते शरद जोशी यांची उद्या ३ सप्टेंबरला जयंती आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी चांदूर रेल्वे तालुक्यातील शहीद स्मारक, नेकनानपुर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.अमरावती जिल्हा शेतकरी संघटनेची बैठक सुद्धा याठिकाणी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमाला अमरावती जिल्हा शेतकरी न संघटनेचे सर्व पदाधिकारी व न कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शेतकरी संघटनेचे विदर्भाध्यक्ष श्रीकांत उर्फ राजाभाऊ पाटील पुसदेकर, अमरावती जिल्हाध्यक्ष माधवगावंडे, पूर्वविभाग प्रमुख दिलीप भोयर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष माया पाटील, माजी जिल्हाप्रमुख दिनकर निस्ताने, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल वाकोडे, धामणगाव तालुकाध्यक्ष प्रा. दिवाकर राऊत, चांदूर रेल्वे तालुकाध्यक्ष सुधाकर थेटे, स्मारक समिती प्रमुख शिवाजी चौधरी आदींनी केले आहे.



# महालक्ष्मी माता स्थापनेच्या शुभपर्वावर आ. रवि राणा, नवनित राणांचे घरोघरी पूजन, दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती,** दरवर्षी प्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गणेशउत्सवा सोबतच ज्येष्ठ गौरी आगमनाची धामधुम असते. महाराष्ट्रामध्ये अनेक घरांमध्ये परंपरेनुसार महालक्ष्मीची स्थापणा करुन मोठ्या श्रध्देने पुजन करण्यात येते. अमरावती व बडनेरा शहरात सुध्दा मोठ्या प्रमाणात घरोघरी महालक्ष्मी मातेची स्थापना करण्यात येते. आ. रवि राणा व भाजपा नेत्या मा. खा. नवनित राणा या दरवर्षी प्रत्येक घरी जावून भेटी देऊन महालक्ष्मी मातेचे पुजन करुन दर्शन घेतात. यावर्षी सुध्दा आ. रवि राणा यांनी महालक्ष्मी स्थापनेच्या महापर्वावर अमरावती शहरातील तसेच बडनेरा जुनीवस्ती वनवीवस्ती येथील घरी जावून भेटी दिल्या व पुजन करुन दर्शन घेतले.



शेतकरी शेतमजुरांच्या जिवनात सुख–समृध्दी नांदण्याकरीता महालक्ष्मी मातेच्याच्या चरणी आ.रवि राणा यांनी साकडे घातले.



# जागृती कॉलनी परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य,घंटा गाडीची अनियमितता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२दर्यापूर –** दर्यापूर शहर हे गेल्या अनेक वर्षापासून विकास कामाबाबत उदासीन असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे संबंधित विभाग व लोकप्रतिनिधी हे पूर्णपणे अकार्यक्षम झालेल्याची खंत व्यक्त होत आहे पालिके मधील संबंधित विभाग हा सुस्त असून शहरातील नागरिकांनी आपला तीव्र संताप पालिका प्रशासनावर व्यक्त केला आहे दर्यापूर शहराला जोडणारे अंतर्गत रस्ते हे पूर्णपणे खंडेमय झाले आहेत टोलेजंग खड्ड्यांची निर्मिती झाली असून त्यामध्ये सरपटणारे प्राणी निद्रा करीत आहेत यासह रस्त्याच्या कडेला काटेरी झुडपांची व गांजर गवताची लक्षणीय वाढ झाली घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिकांनी उघड्यावरच कचरा टाकण्याला पसंती दिली आहे त्यामुळे उघड्यावरील कचऱ्यात किडे कीटक निर्माण झाले असून त्या कचऱ्याची परिसरात दुर्गंधी पसरत चालली आहे त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात चालले आहे हिंगणी रोड परिसर ड्रीमलँड सिटी परिसर जागृती कॉलनी परिसर डॉ पंजाबराव देशमुख परिसर सांगळूदकर नगर परिसर जागृती कॉलनी येथील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे पालिका निवडणुका लांबल्यामुळे हा शहराचा तमाशा झालेला आहे



मुख्याधिकारी यांना वारंवार सूचना देऊन तक्रारी करून सुद्धा कुठल्याच प्रकारची दखल अद्यापही कार्यरत असलेले मुख्याधिकारी यांनी साधे लक्ष सुद्धा केंद्रित केले नाही त्यामुळे परिसरातील नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांवर सुद्धा तीव्र रोष व्यक्त केला आहे ज्या कार्यासाठी आपणाला शासनाने नियुक्त केले आहे किमान त्या कार्याप्रति थोडीफार सुद्धा कृतज्ञता असावी असे परिसरातील नागरिकांनी संतापातुन व्यक्त केले आहे

> दर्यापूर नगरपरिषद पूर्णपणे अकार्यक्षम बनली आहे. संबंधित विभाग हा पूर्णपणे झोपला असून नागरिकांच्या सेवा सुविधा वाऱ्यावर सोडल्या आहेत आम्ही नागरिक नियमित कराचा भरणा करीत असताना सुद्धा त्या तुलनेत एकही धड सुविधा दर्यापूर नगरपालिका पुरवत नसल्याने पालिकेच्या कारभारावर तीव्र संताप आहे परिसरात राहणारे हे नागरिक असून ते जनावर नाहीत याचे भान संबंधित विभागाला असणे गरजेचे आहे तसेच मुख्याधिकारी यांनी केवळ खुर्चीवर न बसता शहराची भयावह परिस्थिती डोळ्याने बघावी.
>
> **विनोद शिंगणे** अध्यक्ष प्रतिभा साहित्य संघ दर्यापूर.

# सर्पमित्र समीर सय्यद यांनी दिले नागाला जीवदान

**विदर्भ प्रजासत्ताक , दि.२दर्यापूर**

पावसाळा आला की बिळातून नागराज बाहेर रोडवर येतात जिकडे जागा मिळेल त्या जागेमध्ये किंवा घरामध्ये घुसल्या जातात अशीच घटना डेपो परिसरात अनुराधा खारोडे यांच्या घराच्या परिसरात सकाळी नाग निघाला तो विषारी नाग पकडण्यासाठी त्यांनी शोधाशूट केली व शेवटी सर्पमित्र समीर सय्यद याला पाचारण करण्यात आले व त्याने पण एक दीड घंटा नंतर चला किनी त्या नागाला आपल्या ताब्यात घेतले तो अतिशय विषारी व चंचल असा दिसून आला त्याला पकडल्यावर खारोडे परिवाराचा जीव पहिले टांगणीला होता मात्र त्यांनी श्वास सोडला भास्करराव पाटील खारोडे यांनी त्या समीर सय्यद चे अभिनंदन केले व सहकार्याबद्दल धन्यवाद सुद्धा दिले.



# खोटं बोलून इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये अडकवलं; आता टी.सी.साठी २५ हजारांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२काजंखेडा**

एका आदिवासी विद्यार्थ्याची फसवणूक करत त्याला नको असलेल्या अभ्यासक्रमात अडकल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे.



श्रावण भिल्या धिकार या विद्यार्थ्याने आपल्या तक्रारीत नमूद केलं आहे की, अंकूश किशन मावस्कर (रा. कन्हेरी) याने अमरावतीत ॲडमिशन करून देतो असे सांगून त्याचे टी.सी., दहावी-बारावीचे मार्कलिस्ट आणि इतर महत्त्वाचे शैक्षणिक कागदपत्र घेतले.

त्यानंतर, श्रावण याची अनिच्छेने २०२०-२१ मध्ये 'तुळसीरामजी गायकवाड पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूर' येथे ॲडमिशन करून दिली गेली.श्रावण याला इंजिनिअरिंग शिकायचेच नव्हते, मात्र चुकीची माहिती देऊन त्यांना चुकीच्या कोर्समध्ये अडकवण्यात आले.

जेव्हा त्यांनी कागदपत्रे मागण्यासाठी संपर्क साधला, तेव्हा त्यांना २५,००० रुपये भरल्याशिवाय टी.सी. मिळणार नाही, असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला.

हा प्रकार केवळ आर्थिक फसवणूक नाही, तर आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर गदा आणणारा प्रकार आहे. श्रावण धिकार यांनी आता मा. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांच्याकडे लेखी तक्रार करून न्याय मागितला आहे.माझं पुढचं शिक्षण अडकलंय. कागदपत्रांशिवाय मी कुठेही प्रवेश घेऊ शकत नाही. माझं भविष्य अंधारात ढकललं जातंय, आणि याला जबाबदार कोण? असा सवाल या विद्यार्थ्याने उपस्थित केला आहे.

# शनिवारपेठ नागरिकांचा सवाल फाटलेल्या चड्डीला ठिगळ, पण कायमस्वरूपी उपाय कधी साहेब?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वरूड**

वरूड शहरातील शनिवारपेठ, देशमुखपुरा, साखरपुरा व संत्रा लिलाव व्यापारी परिसरातील नागरिकांनी आमदार यावलकर साहेब व नगरपालिका प्रशासनाबद्दल रोष व्यक्त केला आहे. रेस्ट हाऊस ते गजानन महाराज मंदिर मार्ग तसेच शनिवारपेठेत दगडी मुरूम टाकून गड्डे बुजवले असले तरी हा केवळ तात्पुरता उपाय असून, फाटलेल्या चड्डीला ठिगळ लावल्यासारखी कामे करून नागरिकांची फसवणूक होते आहे असा आरोप नागरिकांनी केला आहे.



**निधी आणणार केव्हा?**

नागरिकांचा सवाल आहे की, आमदार साहेब, निवडून येऊन एक वर्ष पूर्ण झाले, पण शनिवारपेठ व आसपासच्या भागातील नागरिकांना आजही सावत्र भावासारखी वागणूक मिळते आहे. निधी आणणार केव्हा? आणि कायमस्वरूपी डांबरी रस्ता कधी होणार? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

**मिरवणुकीत भक्तांचे पाय रक्ताळणार?**

येत्या गणेशोत्सवात प्रसिद्ध शनिवारपेठ राजा आदर्श गणेश मंडळच्या मिरवणुकीस हजारो भक्त अनवाणी पायाने सहभागी होणार आहेत. पण रस्त्यांवर टाकलेले धारदार दगडी मुरूम भक्तांच्या पायांना इजा पोहोचवू शकतात. गणपती बाप्पाच्या मिरवणुकीत भक्तांच्या पायाचं रक्त काढण्याचा पाप करू नका साहेब अशी हाक नागरिकांनी दिली आहे.

**संयम संपण्याआधी उपाययोजना करा**

नागरिक म्हणतात की, आतापर्यंत त्यांनी संयम बाळगला आहे. मात्र, शहरातील नागरीक अजून पूर्णपणे जागृत झालेले नाहीत, पण जर आम्हाला दुर्लक्षित केले तर आंदोलन अपरिहार्य होईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.नगरपालिका प्रशासन व आमदारांनी तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाय करावा, हीच सर्वांची अपेक्षा आहे.

# १ कोटी मानधन थकीत, डॉक्टरांचा संप, किडनी ट्रान्सप्लांट लटकले - अमरावतीच्या रुग्णांचे जीव धोक्यात!

## अमरावती शहर (जिल्हा) युवक काँग्रेस आक्रमक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावतीतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी थकीत मानधनाच्या विरोधात पुकारलेल्या संपामुळे रुग्णसेवा पूर्णतः ठप्प झाली असून, ११ किडनी ट्रान्सप्लांटसह अनेक शस्त्रक्रिया रखडल्या आहेत. अमरावती शहर (जिल्हा) युवक काँग्रेसने या बाबत तीव्र संताप व्यक्त करत तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

सुमारे ९ कोटी रुपयांचे मानधन गेल्या अनेक महिन्यांपासून थकीत असल्याने, हॉस्पिटलमधील ६५ डॉक्टरांनी संप पुकारल्याची माहिती युवक काँग्रेसने दिली. डॉक्टरांच्या संपामुळे गंभीर आजारी रुग्णांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. हॉस्पिटलमधील सेवा ठप्प झाल्याने अनेक रुग्णांचे प्राण धोक्यात आले आहेत.

युवक काँग्रेसने हेही अधोरेखित केले की, या गंभीर परिस्थितीकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्ह्याचे पालकमंत्री पूर्णतः दुर्लक्ष करत आहेत. उलट, पालकमंत्री उडवाउडवीची उत्तरे देत जबाबदारी झटकत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.जर ही मागणी तातडीने मान्य झाली नाही, तर युवक काँग्रेस रुग्णांचे व सामान्य नागरिकांचे नेतृत्व करून रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# जिल्हा प्रशासनातर्फे सोमवारी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावती जिल्हा प्रशासनातर्फे एमपीएससी आणि यूपीएससी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिर सोमवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. शिबिरामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयएएस अधिकारी श्रीमती कौशल्या एस. आणि उपजिल्हाधिकारी सोनल सूर्यवंशी उपस्थित राहणार आहेत. दोन्हीही अधिकारी त्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या अनुभवावर आधारीत मार्गदर्शन करणार आहेत. सदर शिबिर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनात होणार असून, प्रवेश निःशुल्क आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# विद्युत सहायकपदाच्या उमेदवारांना मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेले उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्टदरम्यान करण्यात आली आहे. मात्र या तीनही दिवसांत राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे निवड झालेल्या ज्या उमेदवारांना उपस्थित राहता आले नाही, अशा काही गैरहजर उमेदवारांना मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे.त्यानुसार आता ९ व १० सप्टेंबरला गैरहजर उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे, प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. सकाळी १० वाजता ही कार्यवाही सुरू होईल. त्यासाठी संबंधित उमेदवारांनी स्वतः सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार आणिखी एक संधी देऊनही कागदपत्रांच्या पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# मेळघाट विकासाच्या मूलभूत सोयींपासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्ह्यातील मेळघाट आजही विकासाच्या मूलभूत सोयीपासून वंचित आहे. चिखलदरा तालुक्यातील एकताई ग्रामपंचायत अंतर्गत खुटीदा आणि सुभित्ता गावे ही विजेबिना असलेल्या २२ गावांपैकी आहेत. या गावांतील शिक्षक व ग्रामस्थांना दररोज कठीण परिस्थितीचा सामना लागत असून, करावा शासनाकडून याकडे गंभीरतेने पाहिले जात नसल्याचा आरोप होत आहे.खुटीदा गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत जाण्यासाठी शिक्षकांना दररोज खंडू नदी पार करावी लागते.



२२ गावे अजूनही विजेविना;खुटीदा गावातील शिक्षकांचा जीवघेणा प्रवास पावसाळ्यात ही नदी भरून प्रचंड वेगाने वाहते. त्यामुळे शिक्षकाना आपल्या जीवाची पर्वा न करता शाळेत जावे लागते. विद्यार्थ्यांचाही शाळेत जाण्याचा प्रवास जीवघेणा ठरतो.काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाळेला भेट देऊन शिक्षकांवर कारवाई केली होती. मात्र, स्थानिक परिस्थितीमुळे शिक्षकांना अत्यंत हलाखी च्या अवस्थेत काम करावे लागते, हे दुर्लक्षिल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. नदीवर पूल नसल्याने ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

**गावकरी अंधारात सोलर लाईट्स बंद**

खुटीदा व सुमिता या गावांमध्ये आजतागायत वीज पुरवठा झालेला नाही. मेळघाटातील २२ गावे वीजेपासून वंचित आहेत. शासनाने काही काळापूर्वी या गावांमध्ये सोलर लाईट्स बसवले होते, मात्र नियोजन शून्य कामामुळे ते बंद पडले आहेत. त्यामुळे ग्राम स्थांना पुन्हा अंधारात दिवस काढावे लागत आहेत. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, महिलांच्या दैनंदिन कामांवर व ग्रामस्थांच्यासुरक्षिततेवर होत आहे.

**स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे, तरीही विकास शून्य**

स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली, तरी मेळघाटातील अनेक गावे मूलभूतसुविधांपासून वंचित आहेत.सुरक्षित रस्ता व पूल नाहीत.वीजपुरवठ्याचा अभाव. सोलर लाईट्स बंद पडलेले. या समस्यांमुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी आहे.ग्रामस्थ व शिक्षकांनी शासनाकडे खंडू नदीवरील पूल उभारावा व खुटीदा शाळेसाठी सुरक्षित रस्ता उपलब्ध करावा. मेळघाटातील २२ गावांना तातडीने वीजपुरवठा करावा. बंद पडलेल्या सोलर लाईट्सची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी जबाबदार यंत्रणा तयार करावी. मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. ज्या शिक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत त्यांना तात्काळ कार्यमुक्त करुन नवीन शिक्षक शाळांकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. आदी मागण्या केल्या आहेत. 'शिक्षकांना शाळेत जाण्यासाठी जीव धोक्यात घालावा लागत विद्यार्थ्यांना असेल, शिक्षणासाठी संकटांना सामोरे जावे लागत असेल, आणि ग्रामस्थांना अजूनही अंधारात्त जगावे लागत असेल, तर शासनाची 'सर्व शिक्षण सर्वांना' आणि 'सर्वांना बीज' ही घोषवाक्ये फक्त कागदोपत्री काहेत का?' असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

# मार्केटमधील दुकानांची परवानगी, फायर ऑडिट तपासणार आगीच्या घटनेनंतर मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महापालिका क्षेत्रातील अनेक हॉटेल, दवाखाने, मार्केट तसेच मंगल कार्यालयांना फायर ऑडिट करण्यात आलेले नाही. अनेक ठिकाणी बांधकाम परवानगी ही घेतली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आता व्यापारी मार्केटसह सर्व प्रतिष्ठानची बांधकाम परवानगी व फायर ऑडिटची तपासणी करण्यात येईल, असे निर्दे श मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिले. शहर कोतवाली पोलीस ठाण्यासमोरील बजाज खिलोना दुकानाला रविवारी लागलेल्या आगीनंतर मनपा आयुक्तांनी हा निर्णय घेतला.अमरावती महापालिका क्षेत्रात यापूर्वीही



कोचिंग क्लासेस, हॉटेलमध्ये आगीच्या घटना घडल्या आहेत. बजाज खिलोना दुकानाला दुसऱ्यांदाही आग लागली. या आगीची भीषणता लक्षात घेता दुकानातील संपूर्ण साहित्य जळाले. या दुकानालातीन-चार महिन्यापूर्वी भीषण आग लागली. या आगीत लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले होते. ही आग दुसऱ्यांदा लागल्यामुळे मनपा आयुक्तांनी या संदर्भात बाजार परवाना विभागाला सक्त निर्देश दिले.प्राथमिक तपासणी करण्यात आली. दुकानाची जागा प्रथमदर्शनी नझुलची असल्याचे समजते. हे संपूर्ण मार्केट नझुलच्या जागेत असूनही या संपूर्ण मार्केटला बांधकाम परवानगी नसल्याचेही दिसून आले. त्यामुळे अशाच प्रकारचेमनपा क्षेत्रातकिती मार्केट आहे हे देखील पाहणे गरजेचे आहे. बांधकामाची परवानगी नसून या मार्केटचे फायर ऑडिटही झाले नसल्याचे कागदपत्रावरून समजते. त्यामुळे या संपूर्ण मार्केटच्या कागदपत्रांची पडताळणी करून पुढील निर्णय घेण्यात येईल, एवढेच नव्हे तर शहरातील संपूर्ण मार्केटचे बांधकाम परवानगी व फायर ऑडिटची सुद्धा तपासणी करण्यात येणार असल्याचे मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी सांगितले.

# महेंद्रीत शेतकऱ्यावर अस्वलाचा हल्ला! सुदैवाने शेतकऱ्याचा जीव वाचला - वनविभागावर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वरुड**

महेंद्री गावालगत असलेल्या शेतात सकाळी फवारणी करण्याकरिता गेलेल्या रमेश युवनाते या शेतकऱ्यावर अस्वलाने जीवघेणा हल्ला केला. गावालगतच्या शेतामध्ये अचानक बंदर दिसल्याने रमेश त्यांना हाकलण्यासाठी धुर्यापर्यंत गेला असता, त्या ठिकाणी झुडुपामध्ये दबा धरून बसलेल्या अस्वलाने त्याच्यावर झडप घातली.



अस्वलाच्या अचानक हल्ल्याने रमेश धक्कादायक अवस्थेत सापडला, मात्र शेत गावालगत असल्यामुळे त्याच्या आर्त किंकाळ्या ऐकून गावकरी घटनास्थळी धावून आले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे रमेशला अस्वलाच्या तावडीतून सोडवता आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.सुदैवाने रमेश जीव वाचवण्यात यशस्वी झाला, परंतु या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन्य प्राणी वारंवार गावाच्या शिवारात प्रवेश करून नागरिकांवर हल्ले करीत आहेत. तरीदेखील वनविभागाचे अधिकारी याबाबत योग्य उपाययोजना करताना दिसत नाहीत.गावकऱ्यांचा संताप व्यक्त करताना प्रश्न विचारला जात आहे की, वनविभागाचा हा नाकर्तेपणा आणखी किती जीव घेणार? शेतकरी आणि ग्रामस्थांचे जीव असुरक्षित ठेवून प्रशासन जबाबदारी झटकून कधीपर्यंत मोकळे होणार? या घटनेनंतर वन्य प्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी वनविभाग तातडीने ठोस पावले उचलतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अती पावसामुळे बारू गावालगतचा तलाव फुटला

## शेतात पाणीच पाणी; शेतपिकांचे प्रचंड नुकसान; शेतकरी चिंतेत ,प्रशासनाचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२धारणी**

मेळघाटातील बारू गावालगत असलेला तलाव मंगळवारला सकाळी फुटलाने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पाणी जमा झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. धारणी अकोट रोड वर बारू गांव आहे सकाळी शेतकर्यांच्या शेतात अचानक पाणी घुसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले असुन तलावाचे पाण्यामुळे धारणी अकोट मार्गाची वाहतुक विस्कळीत झाली होती.



तलाव फुटल्याने शेतकऱ्यांच्या शेकडो हेक्टर मधील खरीप पिके पूर्णतः जमीनदोस्त झाली आहे. कापूस, सोयाबीन, तुर, मका अशी पिके पाण्याखाली गेली आहे. शेतकर्यांनी सावकारांच्या दावनीला जाऊन यंदा खरीप पिकांची पेरणी केली होती. मेलघाटातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटातून जात आहेत. पैशाच्या कमतरतेमुळे शेतकरी ही रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतर करीत आहे. बरेच शेतकर्यांनी असे सांगितले की या तलावाची बर्याच वर्षांपासून दुरुस्ती केली गेली नाही. तलावाची मुख्य भिंत आधीच लिक झाली होती, वेळोवेळी, गावकर्यांनी आणि शेतकऱ्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी हा तलाव दुरुस्त करण्यासाठी विनवणी केली होती, परंतु शेतकर्यांच्या या महत्त्वपूर्ण मागणीकडे दुर्लक्ष केले गेले असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे मेलघाटचे सर्व तलावात गाळ जमा झाल्याने या तलावांच्या मुख्य भिंतीवर भार पडत आहे. अनेक तलावांच्या मुख्य भिंतीवर मोठे मोठे वृक्ष लागल्यामुळे या वृक्षाचे मुळे तलावाची भिंत कमचोर होत असल्याचे चित्र सध्या या भागात पहायला मिळत आहे. बारू येथिल तलाव जुना आहे. या तलावाच्या दुरूस्तीकडे संबधित विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे आज हा तलाव फुटल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

# गणेशोत्सवासाठी कृत्रिम तलाव सज्ज

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची विसर्जन स्थळांची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**


अमरावती शहरात गणेशोत्सव शांततेत, सुरक्षिततेत व पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावा यासाठी अमरावती महानगरपालिकेने सज्जता दर्शवली आहे. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज प्रथमेश तलाव व छत्री तलाव या दोन प्रमुख विसर्जन स्थळांची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान त्यांनी स्वच्छता, कृत्रिम तलावांची निर्मिती, सुरक्षा व्यवस्था, रोषणाई, वाहतूक नियोजन, सीसीटीव्ही निगराणी व आपत्कालीन उपाययोजनांची तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले.

महापालिकेने यंदा शहरात एकूण २३ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था केली आहे, जेणेकरून मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतांमध्ये न होता पर्यावरणस्नेही पद्धतीने होईल. आयुक्त चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, मूर्तींचे विसर्जन कृपया कृत्रिम तलावातच करावे व जलप्रदूषण टाळावे.

त्यांनी स्पष्ट केलं की, सर्व विसर्जन स्थळांवर स्वच्छता कर्मचारी, होमगार्ड, पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही, प्रकाश व्यवस्था, जनरेटर व आपत्कालीन सेवा सज्ज ठेवण्यात येणार आहेत. गर्दी नियंत्रणासाठी बॅरिकेडिंग व मार्गदर्शन करणारे फलक लावण्यात येतील.वैद्यकीय पथके, अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा देखील सतत सज्ज राहतील. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेसंदर्भात जनजागृती करण्यासाठी मोहीम राबवली जाणार आहे.आयुक्त चांडक म्हणाल्या की, गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि एकात्मतेचा सण आहे. आपण सर्वांनी हा सण आनंदाने आणि पर्यावरणाचा विचार ठेवून साजरा करावा.या पाहणीवेळी उपायुक्त नरेंद्र वानखडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, अग्निशमन प्रमुख लक्ष्मण पावडे, अभियंता शरद तिनखेडे, तसेच अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संशोधन केंद्राच्या शेतशिवारात सापडलेल्या सांगड्याची ओळख पटली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा**

परतवाडा-अंजनगाव मार्गावरील डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या संशोधन केंद्राच्या शेतशिवारात १ सप्टेंबर रोजी एका महिलेचा सांगड मिळून आला होता. या अज्ञात महिलेच्या शतविछेदित सांगड्याची ओळख २४ तासाच्या आत पटवण्यात परतवाडा पोलिसांना यश आले आहे.

मृत महिलेचे नाव लता सुंदरलाल वर्मा (राहणार - आठवडी बाजार, परतवाडा) असे आहे. ही महिला काही काळापूर्वी बेघर निवाऱ्यात ठेवण्यात आली होती. ती गंभीर स्वरूपाच्या कुष्ठरोगाने ग्रस्त होती व एकाच ठिकाणी थांबत नसे. त्यामुळे तिचा ठावठिकाणा निश्चित करता येत नव्हता.

घटनास्थळी परतवाडा पोलिसांच्या पथकासोबतच फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम आणि उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी धाव घेतली होती. सांगड्याचे नमुने तपासणीसाठी घेतले असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास परतवाडा पोलीस करीत आहेत.

# किरीट सोमय्यांचे खोटे आरोप! अमरावतीची बदनामी, विद्यार्थ्यांचे नुकसान - काँग्रेसचा हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अमरावती जिल्ह्यात बांग्लादेशी व पाकिस्तानी नागरिकांना फर्जी जन्म-मृत्यू दाखले देण्यात आल्याचा गंभीर आरोप महसूल प्रशासनावर केला होता. मात्र शासनाच्या चौकशी अहवालानुसार या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट झाले असून, यामुळे जिल्ह्याची नाहक बदनामी झाली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले, असा आरोप काँग्रेसने पत्रकार परिषद घेऊन केला आहे.खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, शहर अध्यक्ष बबलू शेखावत, ग्रामीण अध्यक्ष बबलू भाऊ देशमुख, विरेंद्र जगताप, विलास इंगोले आदींच्या उपस्थितीत ही पत्रकार परिषद पार पडली.

यावेळी काँग्रेसने सांगितले की, सोमय्यांनी अंजनगाव सुर्जी व अन्य तालुक्यांमध्ये बांगलादेशी नागरिकांना जाणीवपूर्वक दाखले दिले जात असल्याचा आरोप करत संपूर्ण जिल्ह्यात तपासणीसाठी महसूल प्रशासनावर दबाव टाकला. परिणामी, अनेक विद्यार्थ्यांना दाखले वेळेवर मिळाले नाहीत आणि त्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले.चौकशी समितीने १४ तहसीलदार व ५ नायब तहसीलदारांना नोटीस दिल्यानंतर सर्व स्तरावर पडताळणी करण्यात आली. चौकशी अहवालात कुठेही विदेशी नागरिकांना दाखले देण्यात आले असल्याचे आढळलेले नाही, हे शासनाकडून लेखी स्वरूपात स्पष्ट करण्यात आले आहे.

खासदार बळवंत वानखडे यांनी ९ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना पत्र लिहून या प्रकारामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर ४ जुलै व १५ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व तहसीलदारांना पूर्ववत दाखले देण्याचे आदेश दिले.काँग्रेसने सोमय्यांवर राजकीय स्टंट करत अमरावती जिल्ह्याचा नामस्मरण करून विद्यार्थ्यांचे व सामान्य नागरिकांचे नुकसान केल्याचा आरोप केला असून, जिल्हा प्रशासनावर वारंवार दबाव टाकणाऱ्या सोमय्यांची ही भूमिका अत्यंत निंदनीय असल्याचे म्हटले आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस, गडकरींना विनंती

दोघांचे हे आजोळ अमरावती शहर आहे.या आजोळाचे ते लेबोरेट्री करत असतील तर कसे चालणार जर अमरावतीला



प्रयोगशाळेसारखं वापरून काही प्रयोग चालू असतील ते योग्य नाही.उट-सूट कधीही हा माणूस प्रत्येक जिल्ह्यात जाऊन शहराचे वातावरण खराब करतो कुठेही जाऊन वातावरण बिघडवतो. हे निंदनीय आहे हे कृत्य खरोखरच निषेधार्थ आहे.

**यशोमती ठाकूर माजी मंत्री**

# फुल बाजारात तीन दिवसांत लाखोंची उलाढाल; वीस रुपये किलोचा अष्टर दोनशे रुपये किलो, गुलाब ५०० रूपये किलो

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

श्रावण महिन्यापासून सणावारांना सुरुवात होते. सणांच्या दरम्यान फुलांचे भाव हे गगनाला भिडले असतात. गणेशोत्सव आणि महालक्ष्मी आगमनाने या फुलांचे भाव दुप्पट होतात. त्यामुळे एरवी विकली जाणारे २० रुपये किलोचे अस्टर दोनशे रुपये विकले जात आहे. कुलांच्या भाववाढीमुळे हारांच्या किमतीवर त्याचा परिणाम पहावयास मिळाला गौरी च्या आगमनांनंतर तीन दिवसात लाखो रुपयांची उलाढाल फुल बाजार मध्ये झाली.



| फुलांची नावे | पूर्वीचे भाव | आत्ताचे भाव |
|---|---|---|
| अष्टर | २० | २०० |
| झेंडू | ४० ते ५० | १०० ते १२० |
| निशीगंधा | १०० | २५० |
| लिली | १० | ५० |
| गुलाब | १०० | ४०० ते ५०० |
| जरबेरा | ७०-८० | २०० ते २५० |

(सर्व दर प्रती किलोमध्ये)

अमरावती शहरात अहमदनगर, पुणे, हैदराबाद, शिर्डी, अंबेजोगाई येथून फुलांचा माल आणला जातो. जवळपास रोज एक ते दोन ट्रक फुले शहरात येतात.गणेशोत्सवापासून सर्वच प्रकारच्या फुलांना मोठ्या प्रमाणात मागणी असते तर गौरींच्या आगमनानंतर या मागणीत प्रचंड वाढ होते. सध्या बाजारात वेगवेगळ्या प्रकारची फुले उपलब्ध आहेत. गणेश मंडळासोबतच महालक्ष्मीचे आगमन झाल्यामुळे फुलांची मागणी ही दुप्पट वाढली आहे. त्यातच गुलाबाच्या हारांची मागणी अधिक असल्याने हजार ते पाच हजारापर्यंत जोडी तसेच कमळांच्या फुलांनाही मागणी असल्यामुळे चाळीस रुपयाचे कमळाचे फुल विकले जात आहे.महालक्ष्मीकरिता मार्केटमध्ये गजरे व वेण्यांची मागणी आहे. शेवंतीची एक वेणी चाळीस रुपयाला मिळत असून गजरे ८० ते ९० रुपयाचा एक अशाप्रकारे उपलब्ध आहेत. त्यातही बाजारात निशिगंधांचेच गजरे उपलब्ध आहेत.

# विवादित जागेवरील अतिक्रमणावर संतप्त सकल हिंदू समाज रस्त्यावर

## गिट्टी हटवण्याची मागणी करत मोर्चा नगरपरिषद कार्यालयावर धडकला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अचलपूर**

अचलपूर शहरातील बुंदेलपुरा परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ओटा व महादेव त्रिशूल ओटा यासंदर्भातील दीर्घकालीन जागा विवाद पुन्हा पेटला आहे. या विवादित जागेवर अतिक्रमण करून बांधकामासाठी आणलेली गिट्टी त्वरित हटवावी, या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने संतप्त मोर्चा काढण्यात आला.



हा मोर्चा थेट अचलपूर नगरपरिषद कार्यालयावर धडकला, व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली की, गणेशोत्सवानिमित्त आयोजित महाप्रसाद कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर ही गिट्टी त्वरित हटविण्यात यावी. सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण आणि धार्मिक कार्यक्रमात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी नागरिक आक्रमक पवित्र्यात होते.सकल हिंदू समाजाने यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांचीही भेट घेऊन आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली.या आंदोलनात बुंदेलपुरा परिसरातील महिलांचा व पुरुषांचा मोठा सहभाग होता, आणि परिसरात तणावपूर्ण शांतता निर्माण झाली होती.धार्मिक कार्यक्रमाच्या ठिकाणी जाणूनबुजून अडथळा निर्माण करणाऱ्या घटकांवर कारवाई झालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली असून, जर लवकरात लवकर गिट्टी हटवली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# पक्षी विमानाला धडकला, २७२ प्रवाशांसह विमान नागपूरला उतरवले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

नागपूरहून कोलकाताकडे निघालेल्या इंडिगो विमानाला पक्षी धडकल्याने काही मिनिटांतच २७२ प्रवाशांना सुखरूप नागपूरला उतरवण्यात आले. उड्डाणानंतर काही वेळातच पक्ष्याची विमानाला धडक बसली यामुळे विमानाचा पुढचा भाग खराब झाला.

विमान कोलकात्याला जाणार होते, परंतु वैमानिकाने हवेत यू-टर्न घेण्याचा निर्णय घेतल्याने नागपुरात आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. या विमानाने आज सकाळी ७ वाजून ५ मिनिटाने उड्डाण घेतली. आकाशात झेप घेताच एका पक्षाने धडक दिली. मिळालेल्या माहितीनुसार, पक्षी



धडकल्याने विमानाच्या पुढच्या भागाचे नुकसान झाले. सर्व प्रवासी सुरक्षित असल्याचे सांगण्यात येत आहे. या विमानात माजी आमदार सुधाकर कोहळे, शेखर भोयर, काँग्रेस नेते नितीन कुंभलकर प्रवास करत होते.

नागपूरमध्ये विमानाला पक्षी धडकल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे विमानाचे आपातकालिन लँडिंग करावे लागले. विमानाचे नागपूर विमानतळावरून झेपवाताना किंवा विमान हवेत असताना पक्षी धडकले. वैमानिकाने कौशल्य वारून विमान सुरक्षितपणे खाली उतरवले.

या घटनांमध्ये २०१८ मध्ये रायपूर ते नागपूर आणि त्यानंतर दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडिया विमानाला नागपूर विमानतळावर लँडिंग करताना पक्षी धडकला. त्यामुळे आपातकालिन लँडिंग झाले.

२०२३ मध्ये, नागपूर-पुणे इंडिगो विमानाला टेकऑफ करताना पक्षी धडकला. त्यामुळे उड्डाण रद्द करण्यात आले. इतर अनेक घटनांमध्ये, विमानाला पक्षी धडकताच, वैमानिकांनी विमान त्वरित धावपट्टीवर उतरवले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. पक्ष्यांच्या धडकेमुळे विमानाचे नुकसान होऊ शकते, तसेच विमानाचे नियंत्रण देखील धोक्यात येऊ शकते. त्यामुळे, विमानाला पक्षी धडकताच, त्वरित विमान लँडिंग करणे आवश्यक आहे.

# परतवाड्यात कंत्राटदारांच्या आत्महत्येच्या निषेधार्थ भावपूर्ण श्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा**

नागपूर येथील प्रसिद्ध कंत्राटदार आणि श्री साई कन्स्ट्रक्शन कंपनीचे संचालक पी. व्ही. वर्मा यांनी आत्महत्या केल्याच्या पार्श्वभूमीवर परतवाडा येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर श्रद्धांजलीचे बॅनर लावून त्यांना व इतर आत्महत्या केलेल्या कंत्राटदारांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




सार्वजनिक बांधकाम विभागाकडून थकीत देयकांच्या प्रश्नी राज्यभरातील कंत्राटदार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनेकांनी घरातील महिलांचे दागिने गहाण ठेवून, व्याजाने पैसे उधार घेऊन शासकीय विकासकामे पार पाडली, मात्र शासनाकडून निधी वितरण न झाल्याने नजीकच्या काळात आत्महत्या करण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत.

याच आर्थिक संकटातून पी. व्ही. वर्मा यांनी निराश होऊन गळफास लावून आपले जीवन संपविले. त्यांच्या निधनाने कंत्राटदारांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली असून, या प्रकाराचा निषेध करण्यासाठी वर्मा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. परतवाड्यातील कंत्राटदारांनी आम्हाला पैसे नकोत, पण आत्महत्या थांबवा अशा आशयाचे फलक लावून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.कंत्राटदारांच्या आत्महत्येची मालिका रोखण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात आणि थकीत देयके अदा करावीत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.